एक शहर, दोन भाऊ


जेरुसलेम शहराच्या कथा



एक शहर, दोन भाऊ

जेरुसलेम शहराच्या कथा

मराठी: अश्विनी बर्वे









एके काळी, जेरुसलेम शहरावर ज्ञानी राजा सोलोमन राज्य करत होता. त्याने शहरात एक भव्य मंदिर बांधले, जे त्याच्या लोकांसाठी एक विशेष आणि पवित्र स्थान होते. दररोज, राजा आपल्या राजवाड्यात बसून अभ्यागतांना भेटत असे, विचारणाऱ्यांना मार्गदर्शन करत असे आणि त्याचे कायदे मोडणाऱ्यांवर न्यायनिवाडा करत असे.





एके दिवशी, दोन भाऊ राजासमोर उभे राहिले.

त्यांचे वडील नुकतेच वारले होते आणि वडिलोपार्जित जमिनीचा वारसा कोणाला मिळावा यावरून त्यांच्यात वाद सुरू होता.

ते राजाकडे सल्ला घेण्यासाठी आले होते.

"कायद्यानुसार, ती माझीच असायला हवी!" एक जण म्हणाला.


"माझा वाटा मलाच मिळायला हवा, हेच योग्य आहे!" दुसरा ओरडला.

त्या शहाण्या राजाने त्यांचा वाद काही वेळ ऐकला. त्यांचा आवाज आणि राग वाढत गेला, अखेरीस त्याने शांततेसाठी हात वर केला.



"मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो," तो म्हणाला, "फार पूर्वीची, जेव्हा येथे शहर वसले नव्हते, या भूमीवर कोणतेही मंदिर बांधले गेले नव्हते. ही ती गोष्ट आहे जी सोलोमनने सांगितली.





फार पूर्वी, पूर्वेकडील टेकड्यांपासून पश्चिमेकडील समुद्रापर्यंत एक नदीचे खोरे जमिनीतून वळणे घेत वाहत होते, आणि त्याच्या उंच कड्यांवर जैतुण आणि बदामाच्या बागांची रांग लागलेली होती. खोऱ्याच्या उगमाजवळ, जिथे नदी एका खडकाळ टेकडीच्या पायथ्याशी वळसा घालत होती, तिथे दोन गावे होती; प्रत्येक गावात पांढऱ्या दगडांच्या झोपड्या आणि जनावरांचे वाडे यांचा समूह होता. दोन भाऊ त्या दोन गावांच्या मधल्या सपाट खोऱ्यातील जमिनीच्या तुकड्यावर शेती करत होते, जिथे माती सुपीक आणि खोल होती — शेतीसाठी अगदी योग्य.मोठा भाऊ खोऱ्याच्या बाजूच्या एका गावात, त्यांच्या सामायिक शेताच्या वर राहत होता. धाकटा भाऊ दुसऱ्या गावात, खोऱ्यात थोडे खाली, शेताच्या खाली राहत होता. त्या गावांना जोडणारे दोन मार्ग होते - एक त्यांना वेगळ्या करणाऱ्या टेकडीवरून, आणि दुसरा त्यांच्या शेताच्या बाजूने खोऱ्याच्या सपाट भागावरून जाणारा.



प्रत्येक शरद ऋतूत, पहिल्या पावसानंतर, प्रत्येक भाऊ आपले गाढव घेऊन येत असे आणि ते दोघे मिळून जमीन नांगरून धान्य पेरत असत. प्रत्येक हिवाळ्यात, वसंत ऋतू येईपर्यंत धान्य उगवून वाढत असे, आणि मग गव्हाच्या ओंब्या भरत, आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला सोनेरी रंगाच्या होत. मग ते भाऊ आपले विळे आणून गहू कापून मळत आणि धान्य पोत्यांमध्ये भरत.जेव्हा सर्व काम संपायचे, तेव्हा ते भाऊ धान्याची पोती मोजून, ती निम्मी-निम्मी अशी समान वाटून घेत. प्रत्येकजण आपल्या जनावरांसाठी समान प्रमाणात पेंढा आणि पोळ्या करण्यासाठी गहू ठेवत असे. मग पुन्हा शरद ऋतू येत असे आणि पुन्हा नांगरणी सुरू करण्याची वेळ येत असे. अशाप्रकारे वर्षे सरत गेली..





मोठ्या भावाचे लग्न झाले आणि लवकरच घरी पोसण्यासाठी बरीच मुले झाली. सुदैवाने, त्याच्या वाट्याला येणारे पीक त्याला हिवाळाभर पुरेल इतके धान्य देत असे. तो समाधानी होता. धाकट्या भावाने कधीच लग्न केले नाही. काही जण म्हणतात की त्याला योग्य स्त्री कधीच मिळाली नाही; तर काही जण म्हणतात की त्याला शांत जीवन आवडत होते. सत्य काहीही असो, तोही आपल्या वाट्याला आलेल्या गोष्टींवर समाधानी होता.एका उन्हाळ्यात, पीक आतापर्यंतचे सर्वोत्तम आले होते. प्रत्येक भावाने धान्याची जड पोती रचली: प्रत्येकी वीस पोती.

मोठ्या भावाचे काम नुकतेच संपले होते, तेव्हा त्याला त्याच्या धाकट्या भावाची आठवण झाली. "मला कुटुंब मिळाल्यामुळे मी किती नशीबवान आहे," असा त्याने विचार केला. "जेव्हा मी म्हातारा होईन, तेव्हा ते माझी काळजी घ्यायला असतील. पण माझ्या बिचाऱ्या भावाला कोणी नाही. त्याला त्याच्या म्हातारपणासाठी बचत करावी लागेल. त्याला या धान्याची माझ्यापेक्षा जास्त गरज आहे."



त्याने आपल्या धाकट्या भावाला एक अनपेक्षित भेट देण्याचे ठरवले. अंधार पडल्यावर, त्याने धान्याची तीन पोती आपल्या गाढवावर लादली आणि त्याला घरामागील टेकडीवरून पलीकडे असलेल्या भावाच्या गावाकडे नेले. ती एक ढगाळ रात्र होती, वाट उजळायला चंद्र किंवा तारे नव्हते, पण त्याला तो मार्ग इतका चांगला माहीत होता की तो डोळे मिटूनही रस्ता शोधू शकला असता. अगदी हळूच, तो दबक्या पावलांनी कोठारात शिरला आणि ती तीन पोती भावाच्या ढिगाऱ्यात टाकली. सकाळी भावाचा चेहरा आठवून तो हसत हसत घरी परतला.





दुसऱ्या दिवशी, नाश्ता करताना त्याच्या बायकोने त्याला पिकाबद्दल विचारले."या वर्षी फक्त सतरा पोती," तो म्हणाला,

"पण आपण नीट वापरले तर तेवढं पुरेसं होईल."

त्याची बायको गोंधळलेली दिसली. "फक्त सतराच का? पीक तर चांगलं आलं होतं."

तिच्या नवऱ्याने फक्त खांदे उडवले आणि हसला.

सगळेजण नाश्ता करत असताना, त्याची बायको दुकानात गेली आणि काही क्षणांनी परत आली.

“अहो, तुम्ही इतके दमला आहात की मोजायलाच विसरलात?"

“तुझं काय म्हणणं आहे?" त्याने विचारले.

"मी दुकानात जाऊन आले, तिथे सतरा नाही, तर वीस पोती आहेत."

'हे अशक्य आहे!'" पण, जेव्हा तो दुकानात गेला, तेव्हा त्याने पाहिले की ते खरे होते. धान्याची वीस पोती!

"हे कसं शक्य आहे?" त्याला आश्चर्य वाटले. "मी स्वप्न पाहत असणार."






त्या संध्याकाळी, सूर्यास्तानंतर, तो धान्याची आणखी तीन पोती घेऊन आपल्या भावाच्या कोठारात गेला. यावेळी, आपल्या गाढवाला आराम देण्यासाठी, त्याने दरीच्या सपाट भागातून जाणारा सोपा मार्ग निवडला. दुसऱ्या दिवशी सकाळी, नाश्ता करताना, त्याने आपल्या पत्नीला समजावून सांगितले की, त्याने तीन पोती वाटून टाकल्यामुळे, एकूण फक्त सतराच पोती उरतील.त्याने आपले बोट ओठांवर ठेवले. "हे एक गुपित आहे," तो कुजबुजला.त्याच्या पत्नीने त्याच्याकडे संशयाने पाहिले. "तुम्हाला खात्री आहे ना, नक्की ," तिने विचारले."मला पूर्ण खात्री आहे. चल, मी तुला दाखवतो." पण जेव्हा त्यांनी कोठारात पाहिले, तेव्हा तिथे अजूनही वीस पोती होती. त्याची पत्नी खूश नव्हती. "तुम्ही माझी अशी चेष्टा का करत आहात?" तिने विचारले. "तुम्ही मला खरं सांगायला हवं." "हा एखादा चमत्कार असू शकतो का?" त्याने विचार केला. "की मी फक्त म्हातारा आणि विसरभोळा होत चाललो आहे?“ तिसऱ्या रात्री, आपले दान देण्याच्या निश्चयाने, तो सूर्यास्ताच्या वेळी आणखी तीन पोती घेऊन निघाला.



तीन दिवसांपूर्वी, धाकट्या भावाने आपली शेवटची गोणी नुकतीच उतरवली होती, तेव्हा त्याला त्याच्या भावाला पोसायच्या असलेल्या सर्व मुलांची आठवण झाली. "त्याला धान्याची माझ्यापेक्षा जास्त गरज आहे," तो विचार करत म्हणाला. "मला माहित आहे मी काय करतो. मी त्याच्या कोठारात गुपचूप काही जास्तीची गोणी ठेवीन, आणि सकाळी त्याला एक छान आश्चर्य मिळेल."अंधार झाल्यावर, त्याने आपल्या गाढवावर तीन गोण्या लादल्या. चांदण्या नसलेल्या आकाशाखाली, तो शेताच्या बाजूने दरीतील वाटेने आपल्या भावाच्या गावाकडे गेला, जिथे त्याने गुपचूप धान्य आपल्या भावाच्या कोठारात ठेवले.दुसऱ्या दिवशी, धाकट्या भावाच्या लक्षात आले की काहीतरी विचित्र आहे. त्याच्या कोठारात धान्याची गोणी गरजेपेक्षा जास्त होती. त्याने ती मोजली – वीस नवीन गोणी. त्याने तीन वाटून टाकली होती, त्यामुळे फक्त सतराच शिल्लक राहायला हवी होती.वीस कशी काय असू शकतात?



हे स्वप्न असावे का? दिवसभर तो गोंधळलेला होता, आणि रात्र झाल्यावर भावाला मदत करण्याच्या निश्चयाने त्याने आपल्या गाढवावर आणखी तीन पोती लादली. ह्या वेळी, त्याने टेकडीवरून जाणारा लहानसा रस्ता निवडला, भावाच्या कोठारात आणखी तीन पोती उतरवली आणि हळूच घरी परतला.








दुसऱ्या दिवशी सकाळी, त्याने आपले धान्याचे कोठार पुन्हा तपासले, आणि तिथे अजूनही वीस पोती होती. "हे कसे शक्य आहे? मला भास होत असावा," त्याने विचार केला. "पण आज रात्री मी हे खरंच करणार आहे." त्या संध्याकाळी, तिसऱ्यांदा, तो आपल्या भावाच्या गावाकडे जाण्यासाठी डोंगरावर चढायला निघाला. ह्यावेळी चंद्र पूर्ण उगवला होता आणि रात्र निरभ्र होती. तो डोंगराच्या माथ्यावर पोहोचताच, त्याला त्याचा भाऊ एक गाढव घेऊन त्याच्या दिशेने येताना दिसला. जणू काही तो स्वतःच्याच प्रतिमेकडे चालत होता..





न बोलताही, प्रत्येकाला आपल्या भावाच्या प्रवासामागील कारण समजले. त्या दोघांना मिळालेल्या प्रेमाची जाणीव झाल्यावर त्यांची हृदये आनंदाने भरून गेली. त्या दोन गावांच्या मधली ती टेकडी, जेरुसलेम शहराची सुरुवात होती. ते पवित्र स्थान, जिथे ते दोन भाऊ भेटले, तेच पवित्र मंदिराचे स्थान बनले.



या शब्दांनी सोलोमनने आपली गोष्ट संपवली. ते दोघे जण शांतपणे उभे राहिले आणि दरबारातील सर्वजण ते काय बोलतात हे पाहण्यासाठी थांबले. बराच वेळानंतर, त्यातील वयस्कर माणसाने वर पाहिले. “भाऊ,” तो म्हणाला. “जे एके काळी आपल्या वडिलांचे होते, ते आता आपले आहे. तुझे नाही, माझे नाही, तर आपले दोघांचे मिळून वाटून घेण्यासाठी.”त्या भावांनी एकमेकांना मिठी मारली आणि खांद्याला खांदा लावून दरबारातून बाहेर पडले. तेव्हापासून, ते आणि त्यांची कुटुंबे आनंदाने एकत्र राहू लागली. आणि त्यांच्या मुलांना, ज्ञानी राजा सोलोमनने प्रथम सांगितलेल्या त्या दोन भावांच्या गोष्टीपेक्षा अधिक आवडणारी दुसरी कोणतीही गोष्ट नव्हती.





जेरुसलेम

जर तुम्ही कधी प्रवास करत असाल आणि युरोप व आशियाच्या सीमा जिथे मिळतात, आणि आशिया व आफ्रिकेच्या सीमा जिथे मिळतात, त्या ठिकाणी आलात, तर तुम्हाला इतिहास आणि रहस्यांनी भरलेले एक शहर आढळेल. शहराच्या तटबंदीत प्रवेश करा, गल्ल्या आणि बाजारांच्या जाळ्यात फिरा, आणि तुम्हाला प्रत्येक वळणावर प्राचीन प्रार्थनास्थळे सापडतील. तिथे एक भव्य सोनेरी घुमट असलेली एक शानदार मशीद आहे; चर्च आणि प्रार्थनास्थळांचे एक चक्रव्यूह आहे; आणि एक प्रचंड पवित्र भिंत आहे जिथे हजारो लोक दररोज प्रार्थना करतात. आठवतं तेव्हापासून, दरवर्षी जगभरातून यात्रेकरू प्रार्थना आणि उपासना करण्यासाठी या शहरात प्रवास करत आले आहेत. त्याचे नाव? अरब लोक त्याला अल-कुड्स, म्हणजे पवित्र शहर म्हणतात; हिब्रूमध्ये ते येरुशलेम आहे; इंग्रजीमध्ये ते जेरुसलेम आहे. असे शहर कसे निर्माण झाले? ही कथा त्याचे उत्तर देते. ही कथा जगभरातील सिनेगॉगमध्ये (ज्यू प्रार्थनास्थळे) एक ज्यू दंतकथा म्हणून ऐकली जाते. शहरात आणि शहराच्या आसपास राहणारे पॅलेस्टिनी अरबही ही कथा सांगतात.



ही एक अरबी लोककथा म्हणून सांगितली जाते. ही कथा सुमारे दोनशे वर्षांपूर्वी जेरुसलेमला भेट देणाऱ्या एका प्रवाशाने प्रथम लिहून काढली, ज्याने ती एका स्थानिक अरबी शेतकऱ्याकडून ऐकली होती. तेव्हापासून, ती जगभरातील लोकांमध्ये आणि ठिकाणांमध्ये पसरली आहे. ती ज्यू, मुस्लिम किंवा ख्रिश्चनांच्या पवित्र ग्रंथांचा भाग नाही; उलट, ती एक साधी लोककथा आहे, जी शेकडो, कदाचित हजारो वर्षांपासून एका कथाकाराकडून दुसऱ्या कथाकाराकडे सांगितली जात आहे आणि तिच्या संदेशाच्या सामर्थ्यामुळे जिवंत राहिली आहे. जेरुसलेम हे एक पवित्र शहर राहिले आहे, ज्याला ज्यू, ख्रिश्चन आणि मुस्लिमांच्या कथा आणि श्रद्धेमध्ये एक विशेष स्थान आहे.



जेरुसलेम हे ते ठिकाण आहे जिथे अब्राहम राहत होता आणि उपासना करत होता, आणि जिथे त्याचे पुत्र, इसहाक आणि इश्माएल यांचा जन्म झाला. ज्यू आणि अरब दोघेही या दोन पुत्रांद्वारे अब्राहम चे वंशज मानले जातात. जेरुसलेम हे ते शहर आहे जिथे राजा डेव्हिड ने आपल्या गोफणीने गोलियाथचा पराभव केल्यानंतर राज्य केले. यानंतर लगेचच, सोलोमन सिंहासनावर आला आणि त्याने मंदिर बांधले, जे नंतर आक्रमणकर्त्यांनी नष्ट केले.नंतर, जेरुसलेम हे ते शहर बनले जिथे येशू ने शिकवले. त्यानंतर, हे ते ठिकाण बनले जिथून पैगंबर मोहम्मद यांनी देवाचा संदेश प्राप्त करण्यासाठी स्वर्गाची पवित्र यात्रा केली आणि जिथे जुन्या मंदिराच्या जागेवर दोन भव्य मशिदी बांधण्यात आल्या.



समाप्त